(रजि.नं.ई २१ दि.१३/०७/१९५३)

सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी

## जिल्हा शाखा जळगाव

''रेडक्रॉस भवन,'' सिव्हील हॉस्पिटल शेजारी, जळगाव फोन नं. ०२५७-२२२६२३३,२२३५८५५,२२३६२५५

• **Email** - ircs_jal@yahoo.in,ircs1953@gmail.com • **Facebook :** ircsjalgaon • **Web :** www.redcrossjalgaon.org

• **Please Download Redcross Jalgaon App.**

दिनांक: १२/११/२०२१

## वार्षिक सर्वसाधारण सभा क्रं.६२ व्या सभेची सूचना

प्रति,
सन्माननिय सभासद
सप्रेम नमस्कार,

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव, सन २०२०-२०२१ ची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २७/११/२०२१ रोजी संध्याकाळी ठीक - ५.०० वाजता संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मा. श्री. अभिजित राऊत (भा.प्र.से.) यांचे अध्यक्षतेखाली रेडक्रॉस भवन, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा, जळगाव येथील सभागृहात आयोजित केली आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**- सभेचे विषय -**

१) दिवंगतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करणे. २) शनिवार दिनांक - २३/०१/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. ३) आर्थिक वर्ष २०२० - २०२१ चा रेडक्रॉस, रक्तपेढी, रेडक्रॉस जेनेरीक मेडिसीन प्रकल्प, रेडक्रॉस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, रेडक्रॉस पाटील धर्मार्थ दवाखाना, रेडक्रॉस आधार व ई सेतु सुविधा केंद्र, कोरोना महामारीतील केलेले कार्य आणि विविध उपक्रमांचा वार्षिक कामकाजाचा कार्य अहवाल सादर करणे. ४) आर्थिक वर्ष २०२० - २०२१ चे अंकेक्षित नफा तोटा पत्रके व ताळेबंद सादर करून मंजूरी घेणे. ५) आर्थिक वर्ष २०२१ २०२२ करीता उत्पन्न खर्चाचे अंदाज पत्रक सादर करून मंजूरी घेणे. ६) आर्थिक वर्ष २०२१ २०२२ करीता ऑडिटरची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणे. ७) नूतन कार्यकारिणीची निवड जाहीर करणे. ८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे.

टीप- १) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास, तहकूब सभेचे कामकाज नियमाप्रमाणे अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सुरू होईल, अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही. २) आर्थिक वर्षातील हिशेबाच्या व्यवहारासंबंधीची माहिती दिनांक - २२/११/२०२१ पर्यंत सकाळी ११ ते दु.५.०० या वेळेत सभासदांनी लेखी मागणी केल्यास कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. ३) सभेसंबंधी आपल्या काही सूचना किंवा आयत्या वेळेच्या विषयांसाठी विषय असल्यास कृपया लेखी स्वरुपात दि. २५/ ११ /२०२१ पर्यंत सकाळी ११ ते दु.५.०० या वेळेत कार्यालयात आणून द्यावेत ही विनंती. ४) कोरोनाचा प्रादुर्भाव पहाता शासन निर्धारित सर्व नियमांचे (मास्क, सॅनीटायझर, सुरक्षित अंतर) पालन करण्यात येईल.५) कृपया सभेस येतांना हा अहवाल सोबत आणावा ही विनंती.
६) फक्त सभासदांनाच सभेस उपस्थित राहता येईल.

सही/-
**विनोद बियाणी**
मानद सचिव

---



सन्माननीय सभासद, सस्नेह नमस्कार,

सर्वप्रथम संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांचे मन:पूर्वक स्वागत व नूतन वर्षाच्या शुभेच्छा...!

नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात आपल्या संस्थेने विविध सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून केलेल्या सेवाकार्याचा लेखाजोखा वर्ष २०२०- २०२१ अखेरचा वार्षिक अहवाल, अंकेक्षित नफा तोटा पत्रके व तेरीज ताळेबंद आपणासमोर सादर करतांना मनस्वी आनंद होत आहे. गेल्या दोन वर्षात कोरोना महामारीच्या काळात जनसामान्यांपर्यंत सेवा पोहोचविण्यात यशस्वी झाल्याने संस्थेच्या सेवाकार्याचा आलेख उंचावला आहे. या काळात ऑक्सिजनचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर होत असल्याने मी संस्थेच्या कार्यकारिणी सदस्यांना ड्युरा ऑक्सिजन सिलेंडर घेण्यासाठी शब्द टाकला असता मानवतेची जाण असलेल्या सर्वच कार्यकारिणी सदस्यांनी जनसेवेची व मानवतेची जाण ठेवत ४० लाख रुपयांचे ड्युरा ऑक्सिजन सिलेंडर जिल्ह्यातील विविध शासकीय रुग्णालयास देऊन सहकार्य केले. अशा संस्थेचा अध्यक्ष या नात्याने आपणा सर्वांचा मला सार्थ अभिमान आहे. कोणतेही समाजाभिमुख कार्य अथवा कोणतीही नैसर्गिक आपत्ती असो तेव्हा सर्वच सदस्य आपापल्या परीने सर्वतोपरी सेवेसाठी तत्पर असतात. अर्थातच यात सर्व कार्यकारिणी सदस्य,सर्व सभासद, दानशूर देणगीदाते, जिल्हा प्रशासन, उत्स्फूर्त रक्तदाते, रक्तदान शिबीर आयोजक, समाजसेवक, स्वयंसेवक, कर्मचारी, हितचिंतक यांचे मिळालेले बहुमोल सहकार्य याबद्दल कार्यकारिणीच्या वतीने सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो.

संस्थेने विविध उपक्रमांच्या माध्यमातून केलेल्या सेवाकार्यांचा सर्व स्तरावर होत असलेली सामाजिक प्रगती म्हणजेच समाजाच्या अढळ विश्वासाचे द्योतक आहे. अहवाल वर्षात कार्यकारिणी मंडळातील सर्व सहकाऱ्यांनी तत्कालीन अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी आणि सध्या माझ्या मार्गदर्शनाखाली प्रगती व सेवाकार्य कार्यक्षमतेवर भर देऊन प्रगत शास्त्रीय व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञांनाचा वापर, सामुहिक निर्णय प्रक्रिया, गतिमान प्रशासन व सेवाभावी दृष्टीकोन या पंचसुत्रीची कार्यप्रणाली अमलात आणली. तसेच कार्यकारिणी मंडळाने महत्वाचे धोरणात्मक निर्णय योग्यवेळी तत्परतेने घेतले. असे निर्णय घेतांना नियमाला अधीन राहून पारदर्शकता, जनहित आणि समाज उपयोगी सेवाकार्य यावर भर देण्यात आला. सर्व सामान्यांसाठी करीत असलेल्या लोकाभिमुख सेवाकार्याला सर्वच स्तरातून समाधानकारक प्रतिसाद मिळत आहे याची अनुभूती आपल्या सर्वांना वारंवार होत आहे.

कोरोना महामारीच्या काळात जळगाव रेडक्रॉसचे सर्व कार्यकारिणी सदस्य, सर्व सभासद, कर्मचारी आणि स्वयंसेवक हे समाजाप्रती असलेल्या कर्तव्य भावनेतून निष्ठापूर्वक काम करीत आहे. जिल्ह्यात कोरोना संसर्ग आटोक्यात आणण्यात आणि कोरोना रुग्णांना सेवा देण्यात रेडक्रॉस उत्कृष्ठ कार्य करू शकली याचे मला निश्चितच समाधान आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याने संस्थेच्या अतूट नात्याची, अढळ विश्वासाची व धेय्य निष्ठ कर्मयोगाची अनेक वर्ष पूर्ण केली व पुढे सुध्दा करीत राहील अशी मला खात्री आहे. संस्थेच्या सततच्या व्यापक सेवाकार्यासाठी शास्वत कार्यक्षम व्यवस्था निर्माण करण्यासाठी रेडक्रॉसचे कार्यकारिणी मंडळ सदैव कटीबद्ध आहे. संस्थेच्या या वाटचालीत सर्व सभासदांनी आपला सक्रीय सहभाग द्यावा व समाधानाची अनुभूती घ्यावी, हि विनंती.

आपल्या सर्वांच्या सदिच्छांच्या बळावर व भक्कम पाठिंब्यामुळे हे सर्व प्रकल्प, उपक्रम आणि वर्तमान काळातील तसेच भविष्यकालीन नवनवीन योजना आपण सर्व मिळून साकार करू अशी आपल्याला ग्वाही देतो. काही सुचना असल्यास अवश्य कळवाव्यात. त्या सूचनांचे स्वागतच केले जाईल. आपला सक्रिय सहभागही अतिशय मोलाचा असेल आणि त्यांची अंमलबजावणी करण्यात आम्हाला आनंदच होईल.

आर्थिक वर्ष सन २०२० - २०२१ चे जमा खर्चाचे लेखा परीक्षण संस्थेचे सी.ए. श्री परीक्षित भदादे यांनी वेळेत पूर्ण करून दिले. संस्थेच्या विकासात विविध उपक्रमांना व दैनंदिन कामकाजास दानशूर देणगीदाते, सेवाभावी संस्थेचे सम्माननीय सभासद, प्रचार-प्रसार माध्यमे, रक्तकेंद्रातील वैद्यकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, प्रशासनातील कर्मचारी, जनसंपर्क अधिकारी, रेडक्रॉस रक्तकेंद्रातील कर्मचारी व इतर सर्व ज्ञात अज्ञात व्यक्ती, संस्था, हितचिंतक यांनी मोलाचे सहकार्य दिले, त्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानतो.

**अभिजित राऊत (भा.प्र.से.)**
अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी

### विनम्र आवाहन

आपण सर्व रेडक्रॉस या आंतराष्ट्रीय संस्थेचे सभासद आहात. आपण आपल्या वाढदिवसानिमित्त, लग्नाच्या वाढदिवसानिमित्त, आप्तेष्टांच्या विशेष दिनानिमित्त किंवा एखाद्या विशेष कार्यक्रमप्रसंगी आपल्या राहत्या भागात, वार्डात किंवा जवळपासच्या परिसरात, आपल्या कार्यक्षेत्रात, सामाजिक,राजकिय,सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम प्रसंगी रक्तदान शिबिराचे आयोजन करा आणि या जीवनदायी कार्यात सक्रीय सहभाग घ्या.आपला सक्रीय सहभाग अनेक रुग्णांना जीवनदान देईल.

चला..आपलंच कुणीतरी आपली वाट पाहतंय...रक्तदान करूया आणि प्रेमाची नाती जोडुया....!

सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगाव

## रेडक्रॉस संस्थेचा कार्य अहवाल




**२४ तास रक्तकेंद्र सेवा :-** संस्थेचा प्रमुख उपक्रम रक्तकेंद्र,यावर्षी १६४३९ रक्तयुनिट्सची उलाढाल झाली. रक्तसंकलनासाठी वातानुकूलित रक्तसंकलन वाहने कार्यरत, अद्यावत व सुधारित तंत्रज्ञानाने सुसज्ज, नॅट (NAT) प्रणालीयुक्त रक्तकेंद्र, डेंगू, विषारी मलेरिया बाधित रुग्णांना प्लेटलेट्स १७२ एस.डी.पी आणि २२६७ आर.डी.पी. रक्तपिशव्या व रक्तघटकांचा रुग्णांना पुरवठा करून जीवनदान देण्यात आले आहे. या वर्षात १६०८ (PCV) पी.सी.व्ही थॅलेसीमिया रुग्णांना विनामूल्य देण्यात आल्या.जिल्ह्याभरातील ७० ते ८० % थॅलेसीमियाग्रस्त रुग्णांना रक्तपुरवठा हा आपल्या रक्तकेंद्रामार्फत होतो. तसेच या थॅलेसीमिया रुग्णांना नॅट (NAT) प्रमाणित रक्ताचा पुरवठा व्हावा म्हणून संस्थेकडून थॅलेसीमिया अमृत योजना सुरू करण्यात आली असून या योजनेस समाजातील दानशूर व्यक्तींचे योगदान मिळाले आहे. यात थॅलेसीमिया बालकाला वर्षासाठी दत्तक योजनेत आपण रु.११,०००/- वार्षिक देणगी देऊन त्या रुग्णांस नॅट ((NAT) प्रमाणित रक्त देऊ शकतो जेणेकरून या रुग्णांचे जीवनमान उंचावेल. आतापर्यंत १७ थॅलेसीमियाग्रस्त बालकांना या योजने अंतर्गत दत्तक घेण्यात आले असून या मुलांना नॅट प्रमाणित रक्तपिशवी देण्यात येत आहे. रक्तकेंद्रामार्फत नियमितपणे रक्तदान शिबीरे आयोजित केली जातात, रक्तदानाच्या प्रचार व प्रसाराकरिता एफएम रेडीओ, बॅनर, पोस्टर्सच्या माध्यमातून रक्तदानाबाबतची जनजागृती केली जाते, तसेच एस.एम.एस व सोशल मिडियाच्या माध्यमातून वेळोवेळी आवाहन करण्यात येते. रक्त संकलनाकरिता संस्थेचे वातानुकूलीत मोबाईल वाहन आहे. त्या माध्यमातून रक्तकेंद्र आपल्या दारी या उपक्रमांतर्गत रक्तसंकलन केले जाते.

रक्तदात्यांच्या परीवाराचे आर्थिक संरक्षण म्हणून एक सामाजिक भावनेतून रक्तदाता अपघात विमा योजना सुरु असून त्यात किमान रु.५०,०००/- ते रु.२,००,०००/- रकमेचे अपघाती विमा सरंक्षण करण्यात येते, या योजनेअंतर्गत आतापर्यंत अपघातात मृत पावलेल्या १६ रक्तदात्यांच्या वारसांना एकूण १० लाख रुपये विमा रक्कम विमा कंपनीकडून मिळवून देण्यात आलेली आहे.

गरीब गरजू रुग्णांना विनामूल्य रक्तपुरवठ्याकरीता जीवनदान योजना सुरु असून या योजेनेत रु. २१०००/- व त्या पटीत दानशूर दात्यांकडून देणगी रक्कम स्वीकारली जाते, या योजने अंतर्गत दरवर्षी कायमस्वरूपी एक रक्तपिशवी गरीब गरजू रुग्णांना विनामूल्य देण्यात येते. तसेच भावस्पर्श योजनेत रु.१५००/- देणगी स्वीकारली जाते. त्यातून वर्षातून एकदाच एक रक्तपिशवी गरीब गरजू रुग्णास विनामूल्य देण्यात येते. अर्थात या देणगीस आयकरात ८० जी नियमानुसार सूट मिळते. आपणही या योजनेत सहभाग घेऊन हातभार लावावा जेणेकरून गरीब व गरजू रुग्णांना विनामूल्य रक्तपुरवठा करणे सहज शक्य होईल.



कन्सल्टंट डॉक्टर्सनी शक्यतो जळगाव शहरासारख्या छोट्या जिल्ह्यात सुदैवाने उपलब्ध सर्वाधिक सुरक्षित नॅट टेस्टेड रक्त व रक्तघटकांचा विनियोग करून नॅट यंत्रणा कायम स्वरूपी कार्यान्वित राहण्याकरीता सहकार्य करावे असे कळकळीचे आवाहन करतो.

**रेडक्रॉस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (RDDRC) :-** केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, दिव्यांग सशक्तीकरण विभाग अंतर्गतचे दिव्यांगांच्या सर्वांगीण पुनर्वसनासाठी कार्यान्वयीत जिल्हास्तरावरील जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) हे इंडियन रेडक्रॉस सोसायटीने माहे जानेवारी २०१८ पासून मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा व्यवस्थापन समिती व इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्या मान्यतेने चालविण्यास घेतले आहे. सदर केंद्रामार्फत जिल्ह्यातील दिव्यांगांचे शारिरीक, मानसिक, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक पुनर्वसनाचे कार्य चालते. त्या अंतर्गत दिव्यांगांना सहाय्यक साहित्य उपलब्ध करुन देणे, त्यांना स्पिचथेरेपी, फिजीओथेरपी, समुपदेशन इ. सेवा देणे तसेच पालकांचे समुपदेशन करणे त्यांना सल्ला व मार्गदर्शन करणे, मेळावे, शिबीरे आयोजीत करुन त्यांना आवश्यकतेनुसार शासनाच्या मदतीने संस्थेच्या मदतीने सेवा सुविधा उपलब्ध करुन देणे इ. कार्य करण्यात येत आहे.

**रेडक्रॉस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रामार्फत आयोजित उपक्रम :**

- दि.१७ मे २०२१ रोजी शहरातील दिव्यांगांसाठी स्वतंत्र कोविड लसीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
- दि. १४ जुन २०२१ रोजी जागतिक रक्तदाता दिनाच्या निमीत्ताने दिव्यांग व्यक्तींनी रक्तदान करून कार्यक्रम साजरा करण्यात आला. तसेच दिव्यांगांना इम्युनिटी किटचे वाटप करण्यात आले.
- दि. २४ जुलै २०२१ रोजी आमदार निधीअंतर्गत मा. पालकमंत्री यांनी दिव्यांग साहित्यासाठी मंजुर केलेल्या रु. १० लाख अंतर्गत साहित्य वाटपासाठी पात्र लाभार्थींची निवड करण्यासाठी मुल्यमापन व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.
- दि. २६ जुलै २०२१ रोजी आमदार निधीतून मा. पालकमंत्री यांनी दिव्यांग साहित्यासाठी मंजुर निधीतून पात्र दिव्यांग लाभार्थींना साहित्य वाटप करण्यात आले.
- दि. १३ व १४ ऑगष्ट २०२१ रोजी आमदार निधीअंतर्गत मा. श्री.किशोर आप्पा पाटील, आमदार पाचोरा व भडगाव यांनी दिव्यांग साहित्यासाठी मंजुर केलेल्या रु. १० लाख निधी अंतर्गत साहित्य वाटपासाठी पात्र लाभार्थींची निवड करण्यासाठी भडगाव येथे मुल्यमापन व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.





- दि. १५ ऑगष्ट २०२१ रोजी आमदार निधीअंतर्गत मा. श्री.सुरेश दामु भोळे (राजु मामा), आमदार जळगाव शहर यांनी दिव्यांग साहित्यासाठी मंजुर केलेल्या रु. १० लाख निधी अंतर्गत साहित्य वाटपासाठी पात्र लाभार्थींची निवड करण्यासाठी जळगाव येथे मुल्यमापन व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.
- दि. १६ ऑगष्ट २०२१ रोजी आमदार निधीअंतर्गत मा. पालकमंत्री यांनी दिव्यांग साहित्यासाठी मंजुर केलेल्या रु. १० लाख निधी अंतर्गत साहित्य वाटपासाठी पात्र लाभार्थींची निवड करण्यासाठी धरणगाव येथे मुल्यमापन व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.
- दि. ८ सप्टेंबर २०२१ रोजी जागतिक फिजीओथेरपी दिवसाच्या निमीत्ताने RDDRC कार्यालयास फिजीओथेरपी देणा-या तज्ञांचा सन्मान करण्यात आला. व दिव्यांग मुलांच्या पालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

**रेडक्रॉस ई सेतु व आधार सुविधा केंद्र :-** केंद्र व राज्य सरकारचा उपक्रम असलेले आपले सरकार सेवा केंद्र आणि ई सेतु व आधार सुविधा केंद्र रेडक्रॉसमध्ये सुरू असून शासनाने ठरवून दिलेल्या सेवाशुल्कात सेवा दिली जाते.यात उत्पन्न दाखला, आधार कार्ड नवीन व दुरुस्ती, ७/१२ उतारा, हयातीचा दाखला(जीवन प्रमाणपत्र), उद्योग आधार, अधिवास व राष्ट्रीयत्व दाखला,पॅनकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, पासपोर्ट, नॉन क्रीमिलीयर,जेष्ठ नागरिकत्व, परीक्षा/नोकरी ऑन लाईनफॉर्म, चारित्र्य पडताळणी (पोलीस व्हेरीफिकेशन प्रमाणपत्र), ३३% आरक्षण प्रमाणपत्र, वीजबिल भरणा, नवीन रेशन कार्ड इत्यादी सेवा देण्यात येत आहेत. त्यासाठी स्वतंत्र कक्ष ठेवण्यात आले असून ई सेतु व आधार सुविधा केंद्र, रेडक्रॉस भवन, जळगाव येथे सोमवार ते शुक्रवार स.१० ते सायं. ५.०० वाजे पर्यंत सुरू असते. या केंद्रामार्फत आजपर्यंत ३००० पेक्षा जास्त नागरिकांना आधारकार्डची सेवा देण्यात आली असून ५०० पेक्षा जास्त नागरिकांनी सेतू केंद्रामधील विविध सुविधेचा लाभ घेतला आहे.

**रेडक्रॉस जेनेरीक मेडिकल स्टोअर्सचे कार्य जनसेवार्थ सुरु : -** जेनेरीक मेडिसीन भारत सरकार पुरस्कृत उपक्रम असून जनतेला स्वस्त औषधी मिळावी या साठीचा प्रकल्प आहे. या प्रकल्पा अंतर्गतातील फुलफगर फार्मा, विसनजी नगर व रेवती मेडिको जेनेरीक औषधालय, शनीपेठ या ठिकाणी सर्व सामान्य जनतेला नामवंत कंपन्यांची जेनेरिक औषधी स्वस्त दरात उपलब्ध करून दिली जात आहे. या जेनेरिक मेडिकल दुकानांचा अनेक सर्वसामान्य नागरिक लाभ घेत आहेत.



रेडक्रॉसची वास्तू ही शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने आणि शासकीय रुग्णालय जवळ असल्याने मोठ्या प्रमाणात रुग्णांची ये- जा सुरु असते. कोरोना काळात कोविड रुग्णाना अत्यंत सवलतीच्या दरात रेमडीसीव्हर उपलब्ध करुन दिले. गरीब व गरजू रुग्णांना सवलतीच्या दरात औषधे उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातून रेडक्रॉस संचलित केदारनाथ मेडिकल स्टोअर्स सुरु करण्यात आले आहे. यात सर्व प्रकारची औषधी जसे जेनेरीक मेडिसिनवर छापील किमंतीच्या ६० ते ७० टक्के सवलत, स्टँडर्ड मेडिसिनवर ५ ते १० टक्के सवलत व आयुर्वेदिक औषधीही सवलतीत दिली जातात. त्यामुळे ग्राहकांमध्ये विश्वासाहर्ता निर्माण झालेली आहे. केदारनाथ मेडिकल स्टोअर्सच्या माध्यमातून आजपर्यंत १८००० रुग्णांना सुरळीत औषधी सेवा देण्यात आली आहे.

**रेडक्रॉस संचलित पाटील धर्मार्थ दवाखाना वाघनगर येथे रुग्णसेवेसाठी सज्ज :-** कै.प्रा. शालीग्राम नवलराम पाटील आणि श्रीमती जिजाबाई शालिग्राम पाटील यांनी दान केलेल्या इमारतीत सुरु केलेल्या रेडक्रॉस संचलित पाटील धर्मार्थ दवाखान्यात महिन्याला जवळपास ५०० ते ७०० रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत. तसेच दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी या दवाखान्यात महानगरपालिकेमार्फत गर्भवती महिला व नवजात बालके यांना लसीकरण केले जाते. संपुर्ण कोरोना लॉकडाऊन काळातही पाटील धर्मार्थ दवाखान्या मार्फत उत्कृष्ठ रुग्णसेवा दिली गेली. मागील वर्षभरात जवळजवळ ८५३८ रुग्णांनी या दवाखान्यातील सुविधांचा लाभ घेतला आहे.

**रेडक्रॉस प्रथमोपचार व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण :** शासकीय,निमशासकीय, कंपन्या,कारखाने इत्यादि ठिकाणी कामगारांना आवश्यक लागणारे मान्यता प्राप्त प्रथमोपचार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करुन कामगारांना तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षित करण्यात येते.यात विविध कंपनीतील कर्मचारी व विविध समाजसेवी संस्थांच्या प्रतींनिधींनी प्रशिक्षण घेतले आहे. तसेच आपत्ती येण्याअगोदर, आपत्ती आल्यावर व आपत्ती आल्यानंतर जी परिस्थिती निर्माण होते त्यात आपतग्रस्तांचे जीव वाचवणे, जखमींना प्रथमोपचार करणे, पुढील उपचारासाठी हॉस्पिटल येथे पाठवणे, आपत्कालीन भागातील प्रभावी क्षेत्राची परिस्थिती पूर्वपदावर आणणेसाठी कार्य करणे, परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे या बाबतचे संपूर्ण प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात येते आणि तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात येते. आजपर्यंत प्रशिक्षण घेतलेल्या स्वयंसेवकांनी संपूर्ण कोरोना काळात रेडक्रॉसच्या उपक्रमात मोलाचे सहकार्य केले.



**ज्युनियर व युथ रेडक्रॉस :-** ज्युनियर व युथ रेडक्रॉस अंतर्गत जळगाव जिल्ह्यातील गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग, साकेगाव येथे युथ रेडक्रॉस शाखेचे उद्घाटन करण्यात आले. आरोग्य, सेवा आणि मैत्री या सिद्धांतावर आधारित या उपक्रमाच्या माध्यमातून जागतिक अवयवदान दिनानिमित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात रांगोळी

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगाव



स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, अवयवदान जनजागृती संबंधी काव्य स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. याशिवाय पथनाट्याद्वारे हि जनजागृती करण्यात आली. सर्व विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**विद्यालयातून प्लॅस्टिक संकलन केंद्र :-** पर्यावरण सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना शाळेतून सवय लागावी या उद्देशाने सागर मित्र,सामनेर या संस्थेचे श्री. विशाल सोनकुळ, यांच्या सहकार्याने जळगाव शहरातील विविध शाळेतून प्लॅस्टिक केर कचरा जमा करून त्याची योग्यरीत्या विल्हेवाट करणेबाबतचे कार्य गेल्या दोन वर्षापासून पासून सुरू आहे. जळगाव शहर आणि जवळपासच्या तालुक्यातील ५० शाळा, २५००० विद्यार्थी या उपक्रमात जोडल्या असून नियमित स्वरुपात प्लॅस्टिक कचरा संकलन केले जाते. आजपर्यंत जवळजवळ ४ टन प्लॅस्टिक कचरा संकलन करण्यात आले आहे.

**एचआयव्हीग्रस्त बांधवांना मदतीचा हात :-**जळगाव जिल्ह्यातील एचआयव्हीग्रस्तांना रेडक्रॉस व जाणीव बहुउद्देशीय संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने सकस आहाराचे वाटप करणे, दिवाळी निमित्त कपडे व मिठाई भेट देणे, थंडीपासून बचाव होण्यासाठी स्वेटर, ब्लॅकेटची मदत करणे, त्यांना रेशन मिळावे म्हणून त्यांना रेशन कार्ड बनवून देणे, आधार कार्ड बनवून देणे, एचआयव्हीग्रस्त मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून चांगल्या मार्कांने पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करणे, शैक्षणिक साहित्याची मदत करणे अशा विविध स्वरुपात सहकार्य रेडक्रॉस सतत करीत असते.

**जागतिक रेडक्रॉस दिन साजरा :-** ८ मे २०२१ रोजी जागतिक रेडक्रॉस दिवस हा कोरोना संसर्गाच्या परिस्थितीमुळे निवडक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉसचे अध्यक्ष मा. श्री.अभिजीत राऊत यांच्या शुभहस्ते रेडक्रॉसचे ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी रक्तदान, प्लेटलेटदान आणि प्लाझ्मादानाच्या ब्रँड अम्बेसेडरची घोषणा करण्यात आली. रक्तदान ब्रँड अँबेसेडर म्हणून श्री. अतुल अनंत मुळे, प्लेटलेट ब्रँड अँबेसेडर म्हणून श्री. अयाज मोहसीन आणि कोरोना प्लाझ्मा ब्रँड अँबेसेडर म्हणून कु. शगुन पवन मंडोरा यांच्या नावांची घोषणा करण्यात आली.



**डोळे तपासणी शिबीर आणि चष्मे वाटप :** – इंडियन रेडक्रॉस सोसायटी आणि बिबा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पिंप्राळा शिवार, वाघ नगर भागात डोळे तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरात १५० नागरिकांची डोळे तपासणी करण्यात आली आणि आवश्यकतेनुसार चष्मे वाटप करण्यात आले.या शिबिराला पिंप्राळा शिवार, वाघ नगर परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या सोबतच कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये हि नागरिकांना बऱ्याच मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागला. या काळात हि रेडक्रॉसमार्फत सर्वतोपरी सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**रेडक्रॉस पाटील धर्मार्थ दवाखाना येथे दमा तपासणी शिबीर : –**इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव संचलित पाटील धर्मार्थ दवाखाना रुग्णसेवेसाठी कार्यरत असून या ठिकाणी विविध तपासणी शिबीर आयोजित केली जातात. नुकतेच येथे जुना दमा तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. या तपासणी शिबिरात धाप लागणे, श्वास घेताना घरघर आवाज येणे, तीव्र खोकला येणे, खोकल्यामध्ये कफ येणे, छातीवर दाब येणे, खोकला करताना रक्त पडणे, संध्याकाळी वाढणारा ताप, वजन कमी करणे, भूक कमी लागणे, बाल दमा, छातीत पस जमा होणे या प्रकारच्या सर्व आजारांवर तपासणी करून पुढील उपचारासाठी आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रुग्णांना रेडक्रॉस संचलित केदारनाथ मेडिकल येथून सवलतीच्या सेवाशुल्कात औषधी उपलब्ध करून देण्यात आली. शहरातील विविध भागातील ५० पेक्षा जास्त रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

**रेडक्रॉस लसीकरण केंद्र :** जानेवारी महिन्याच्या सुरुवाती पासून जळगाव जिल्ह्यात लसीकरण मोहीम सुरु झाली. पण लसीकरणाबाबत नागरिकांमध्ये खूप भीतीचे वातावरण होते. लसीकरण करावे कि नाही याबाबत अनेक संभ्रम निर्माण होत होते. या शिवाय जिल्ह्याला लसीकरण करण्यासाठी खूप मोठी यंत्रणा उभी असणे गरजेचे असताना माननीय जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष श्री.अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनानुसार, रेडक्रॉस पदाधिकाऱ्यांच्या प्रयत्नामुळे आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सहकार्याने रेडक्रॉस भवन येथे लसीकरण केंद्र सुरु करण्यात आले. रेडक्रॉस भवन हे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने नागरिकांना लसीकरणासाठी येणे सोपे झाले. अतिशय शिस्तबध्द नियोजन, सोशल डीस्टन्सिंगचे पालन करून बसण्याची सुविधा, चार रजिस्ट्रेशन टेबल, दिव्यांग बांधवांना विनाविलंब लसीकरण व्यवस्था, रोज सॅनिटायजर व्यवस्था, गर्दी टाळण्यासाठी लस उपलब्धतेनुसार कुपन व्यवस्था अशा सर्व सोयी सुविधांसह सुरुवातीला दिवसभरात २५० ते ३०० नागरिक या लसीकरणाचा लाभ घेत होते. नागरिकांमध्ये गैरसमज दूर झाल्यानंतर एका दिवसात १२०० ते १५०० पर्यंत नागरिकांना सुरळीत लसीकरण करणे शक्य झाले. लसीकरणाचे नियम, आवश्यक कागदपत्र आणि लसीकरणाच्या जनजागृतीबाबतचे फलक दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात आले. रेडक्रॉस लसीकरण केंद्रात आजपर्यंत ५९७०० नागरिकांनी लसीकरणाचा लाभ घेतला असून हे केंद्र अजूनहि जळगावकरांच्या सेवेत सज्ज आहे.



**पोलीस परिवारासाठी लसीकरण केंद्र :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, पोलीस प्रशासन आणि इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्या सहकार्याने पोलीस मल्टीपर्पज हॉल येथे पोलीस बांधवांच्या परिवारासाठी सर्व सोयीयुक्त लसीकरण केंद्र सुरु करण्यात आले. या लसीकरण केंद्रात पोलीस विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या परिवाराला लसीकरण करण्यात आले. यात ६५४२ नागरिकांना लसीकरण करण्यात आले.



**कोविड -१९ विनामुल्य ॲन्टीजन तपासणी केंद्र :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव शहर महानगरपालिका आणि इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड -१९ ॲन्टीजन विनामुल्य तपासणी केद्र सुरु करण्यात आले. हे तपासणी केंद्र शहराच्या मध्यभागी म्हणजेच महानगरपालिका संचलित सानेगुरुजी वाचनालयातील टेबल टेनिस हॉल,शासकीय रुग्णालयाच्या मागे सुरु करण्यात आले. कोरोना संसर्गाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शासकीय यंत्रणेवर खूप मोठ्या प्रमाणात ताण होता. तसेच रुग्णांची तपासणी लवकर झाल्यास उपचार लवकर करणे शक्य होईल. या सर्व बाबींचा विचार करून माननीय जिल्हाधिकारी श्री. अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाने सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत या केंद्रात सुरळीत सेवा देण्यात आली. रविवारी देखील हि सेवा नागरिकांसाठी सुरु होती. दिनांक २४ जुलै २०२१ पर्यंत ९५८२ नागरिकांची ॲन्टीजन तपासणी करण्यात आली असून त्यात कोरोना पॉजिटीव्ह असलेल्या ५६४ रुग्णांना त्वरित उपचाराबाबत मार्गदर्शन करून शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले.

**लसीकरण केंद्र आपल्या दारी अंतर्गत फिरते लसीकरण केंद्र :** बरीच महाविद्यालये आता सुरळीतपणे सुरु झाली असताना अजूनहि बऱ्याच विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घेतलेले नाही. तसेच कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून अनेक महाविद्यालयांमध्ये लसीचे दोन्ही डोस पूर्ण असल्याशिवाय महाविद्यालयात प्रवेश देत नाहीत. लवकरात लवकर १०० % लसीकरण पूर्ण व्हावे आणि कोरोना संसर्ग वाढू नये हाच त्यामागचा प्रामाणिक उद्देश्य आहे.या सर्व बाबींचा विचार करून लसीकरण केंद्र आपल्या दारी हे फिरते लसीकरण केंद्र सुरु करण्यात आले. या अंतर्गत शहरातील महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थी व शिक्षकवर्ग यांना लसीकरण करण्यात येत आहे.

**रेडक्रॉस ऑक्सिजन बँक :** इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने रेडक्रॉस ऑक्सिजन बँक सुरु करण्यात आली. २० ड्युरा सिलेंडरच्या उपक्रमानंतर इंडियन रेडक्रॉस सोसायटी राज्य शाखा मुंबई यांच्या बहुमोल सहकार्याने प्राप्त झालेल्या ८६ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर रुग्णसेवेला समर्पित करण्यात आले. बऱ्याच रुग्णांना उपचारानंतर घरीही ऑक्सिजनची आवश्यकता भासते. अशा परिस्थितीत रुग्णांना विनामुल्य ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर रेडक्रॉस ऑक्सिजन बँकमार्फत उपलब्ध करून दिले जाते. आज पर्यंत १८ रुग्णांना याचा लाभ झाला आहे.




**२० ड्युरा सिलेंडर रुग्णसेवेसाठी समर्पित :** रुग्णांना उपचारासाठी कृत्रिम ऑक्सिजन देण्यासाठी हॉस्पिटल मध्ये लिक्विड सिलेंडरची मदत घेतली जाते. त्याची क्षमता ७ किलो लिटर असते. सिलेंडर रिकामे झाल्यावर ऑक्सिजनने भरलेले सिलेंडर बदलवतांना सिलेंडर रिकामे झाल्यावर त्यात जवळजवळ २० ते ३० % ऑक्सिजन शिल्लक राहत होता, परिणामी तेवढा ऑक्सिजन वाया जात होता.याकरीता ड्युरा सिलेंडर हा उत्तम पर्याय आहे. यामुळे ड्युरा सिलेंडर बदलविण्याची खास सुविधा असल्याने ऑक्सिजन पुरवठा खंडित न करता प्राणवायूचा अपव्यय टाळता येणे सहज शक्य झाले. २५ ते ३० जम्बो सिलेंडर मध्ये जितका ऑक्सिजनचा साठा असतो तो फक्त एका ड्युरा सिलेंडरमध्ये असतो. त्यामुळेच ६ ड्युरा सिलेंडरमध्ये जवळजवळ १८० जम्बो सिलेंडर इतका ऑक्सिजन साठा असतो. करीता ६०० जम्बो सिलेंडर मध्ये जितका ऑक्सिजनचा साठा असतो. तेव्हडा साठा २० ड्युरा सिलेंडरमध्ये आहे. इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगावने चाळीस लाख रुपये खर्च करून खरेदी केलेल्या २० ड्युरा सिलेंडरपैकी शासकीय महिला रुग्णालय, मोहाडी रोड – ४ ड्युरा सिलेंडर, इकरा कोविड सेंटर– ६ ड्युरा सिलेंडर, शासकीय कोविड सेंटर, पाळधी– २ ड्युरा सिलेंडर, ग्रामीण रुग्णालय, चाळीसगाव– २ ड्युरा सिलिंडर, उपजिल्हा रुग्णालय, मुक्ताईनगर– २ ड्युरा सिलेंडर असे बसविण्यात आले असून त्या माध्यमातून ज्या रुग्णांना ऑक्सिजनची गरज आहे त्यांना अखंडितपणे ऑक्सिजनचा पुरवठा सुरु आहे. ४ ड्युरा सिलेंडर हे आपत्कालीन परिस्थितीसाठी स्वातंत्र्यरित्या सुरक्षित ठेवण्यात आलेल आहेत.

**केनिया देशाकडून इम्युनिटी फूड कीटचे हेल्थ केयर वर्कर आणि फ्रंट लाईन वर्कर यांना वाटप :** कोरोना काळात सर्वच स्तरावरील हेल्थ केयर वर्कर आणि फ्रंट लाईन वर्कर यांनी रुग्णांना जीवनदान देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले आणि अजूनहि करीत आहेत. सर्वांना काम करताना प्रोत्साहन मिळावे आणि सर्वांच्या पाठीवर कौतुकाची थाप मिळावी या उद्देशाने केनिया सरकारने पाठविलेले रेडक्रॉस इम्युनीटी फूड किट्स रेडक्रॉस राज्य शाखा मुंबई मार्फत जळगाव रेडक्रॉस जिल्हा शाखेला प्राप्त झाले. इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखेमार्फत हेल्थ केयर वर्कर आणि फ्रंट लाईन वर्कर यांना साहित्य वाटप करण्यात आले. रेडक्रॉस संस्थेत सेवा देणारे सहकारी, शासकीय रूग्णालयामार्फत लसीकरण केंद्रात सेवा देणारे कर्मचारी,रेडक्रॉसचे स्वयंसेवक अशा एकूण ४८८ हेल्थ केयर वर्कर आणि फ्रंट लाईन वर्कर यांना रेडक्रॉस कडून इम्युनिटी फूड कीट देण्यात आले.




**जिंदा भवन येथे विनामुल्य ॲन्टीजन तपासणी केंद्र :** औद्योगिक वसाहतीचा दैनंदिन व्यवहार सुरु झाल्यानंतर हि कोरोना संसर्गाची भीती अनेकांच्या मनात कायम होती. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सर्व कर्मचाऱ्यांची वेळोवेळी ॲन्टीजन तपासणी झाल्यास या संसर्गाचा प्रादुर्भाव इतरांना होणार नाही आणि कर्मचाऱ्यांना त्वरित तपासणी करून घेणे सोयीचे होईल या सर्व बाबींचा विचार करून एमआयडीसी येथील जिंदा भवन येथे सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे तपासणी केंद्र सुरु करण्यात आले. औद्योगिक वसाहतीतील सर्व कंपन्यांमधील कामगारांना सुविधा मिळाल्याने सर्वांना सोईचे झाले.

सेवा...   स्नेह...   समर्पण...

# ✚ इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगाव ✚




दिनांक २४ जुलै २०२१ पर्यंत ४०७६ कामगारांची ॲन्टीजन तपासणी करण्यात आली असून त्यात कोरोना पॉझिटीव्ह असलेल्या ८२ रुग्णांना त्वरित उपचाराबाबत मार्गदर्शन करून शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले.

**रेडक्रॉस मेडिसीन बँकमार्फत औषधी वाटप :** इंडियन रेडक्रॉस सोसायटीला रॅपटाकोस कंपनीमार्फत रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठीच्या औषधी, प्रोटीन/व्हिटॅमीन पावडर, रक्तवाढीच्या औषधी प्राप्त झाल्या. यावल तालुक्यातील आसराबारी पाडा हे ऊसतोड कामगार राहत असलेले ४०० आदिवासी लोकांची लोकवस्ती आहे. याठिकाणी लहान मुले कुपोषित असल्याचे प्रमाण जास्त आहे. अशा सर्व ८८ बालकांना, गर्भवती महिलांना व इतरांना या औषधींचे वाटप डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले. तसेच समतानगर भागातील ३५ गर्भवती महिला आणि लहान बालकांना औषधींचे वाटप करण्यात आले. तसेच रेडक्रॉस संचलित पाटील धर्मार्थ दवाखाना येथे येणाऱ्या ७० रुग्णांनाही या औषधींचे गरजेनुसार वाटप करण्यात आले.

**कोरोना आरटीपीसीआर(RT-PCR) रिपोर्टचे क्लाऊड सॉफ्टवेअर कार्यान्वित :** कोरोना संसर्ग आटोक्यात आणण्यासाठी जळगाव जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा व प्रशासन खूप मोठ्या प्रमाणावर काम करत असतांना प्रशासनाची मोठी गैरसोय दूर करण्यासाठी रेडक्रॉस आणि काही दात्यांनी पुढाकार घेतला. कोरोना रिपोर्ट बाबतीतचे पुणे येथील क्लाऊड पॅथॉलॉजीचे सॉफ्टवेअर खरेदी केल्यामुळे रुग्णांना फक्त सहा तासात त्यांच्या मोबाईलवर मॅसेजद्वारे रिपोर्ट पाठविणे शक्य झाले. हा अत्यंत महत्वाचा विषय मार्गी लागल्यामुळे रुग्णांची मोठी गैरसोय टाळता आली. कोरोना तपासणी केल्यानंतर रिपोर्ट येण्यासाठी रुग्णांना २ ते ३ दिवस वाट पहावी लागत होती. त्यामुळे रुग्णच नाही तर परिवारातील इतरांना हि कोरोना संसर्ग आहे किवा नाही याबाबत खूप संभ्रम निर्माण होत होता. शिवाय रिपोर्ट येण्याआधी जर रुग्णाचा त्रास वाढल्यास त्याला कोणत्याही हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात मोठ्या अडचणी येत होत्या. या सर्व बाबींमुळे रुग्णाची प्रकृती जास्त खालावण्याचा धोका ही होता. या सर्व अडचणींचा विचार करून इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या पुढाकाराने आणि सर्व दात्यांच्या सहकार्याने पुणे येथील क्लाऊड पॅथॉलॉजीचे सॉफ्टवेअर खरेदी केले असून या सॉफ्टवेअर मुळे १ लाख रुग्णांना कोरोना आरटी पीसीआर रिपोर्ट फक्त सहा तासात त्यांच्या मोबाईल वर मॅसेजद्वारे मिळणे शक्य झाले. त्यामुळे रुग्णांवर त्वरित उपचार सुरु झाल्यामुळे अनेक कोरोना रुग्णांचे प्राण वाचविण्यास मदत झाली. हे सॉफ्टवेअर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील RT-PCR लॅबला देणगी स्वरुपात देण्यात आले.



**आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत पूरग्रस्तांना मदत :** चाळीसगाव तालुक्यात अतिवृष्टीमुळे अनेक परीवारांचे जनजीवन विस्कळीत झाले. बरेच परिवार उघड्यावर पडले. माननीय जिल्हाधिकारी श्री. अभिजित राऊत यांच्या मार्गदर्शनाने इंडियन रेडक्रॉस सोसायटी आणि अनेक दानशूर दात्यांच्या सहयोगाने प्रत्येक परिवाराला २० भांडे असलेला सेट, चटई, बादली, किराणा सामान (साखर, चहा पावडर, डाळ,शेंगदाणे, तांदुळ, तेल, मीठ, गहू पीठ) ताडपत्री, लायटर, खाकरा, लोणचे, पाणी बॉटल, आवश्यक औषधी इत्यादी साहित्याचे १५० कीट वाटप करण्यात आले. तसेच जामनेर तालुक्यातील आपत्तीग्रस्त गावांमध्ये जाऊन अत्यावश्यक १८ वस्तूंचे किट तयार करून ७५ कुटुंबांना देण्यात आले. या सोबतच गर्भवती महिला, लहान बालके व इतर नागरिकांसाठी रॅपटाकोस कंपनीचे रोगप्रतिकार शक्ती वाढविणारी औषधे, प्रोटीन पावडर, रक्तवाढीची औषधे ही डॉक्टरांच्या मार्गदर्शनाने देण्यात आली.

**ॲन्टीजन तपासणी शिबीर :** इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या सहकार्याने जळगाव शहरातील विविध भागात ॲन्टीजन तपासणी शिबीर घेण्यात आले. यात मोहाडी रोड, तुकाराम वाडी, पांडे चौक, नेहरू नगर, रवींद्र नगर, निमखेडी शिवार इत्यादी भागात हे शिबीर घेण्यात आले. या शिबिराचा १५६ नागरिकांनी लाभ घेतला.

**प्लाझ्मा थेरपी उपक्रम :** इंडियन कौन्सिल मेडिकल रिसर्च, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आणि अन्न औषध प्रशासनाच्या परवानगीने रेडक्रॉस रक्तपेढीतर्फे कोविड आजारातून बरे झालेल्या रुग्णांचा प्लाझ्मा दान करून घेणे व तो प्लाझ्मा मागणीनुसार कोरोना ग्रस्त रुग्णांना पुरविणे या कार्यास सुरुवात करण्यात आली. माननीय मुख्यमंत्री नामदार श्री.उद्धवजी ठाकरे यांनी व्हिडियो कॉन्फरन्सच्या माध्यमातून या सेवा उपक्रमाचे उद्घाटन केले. कोरोना काळाच्या दुसऱ्या लाटेमध्ये ही कोरोना प्लाझ्मा थेरपी रुग्णांना खूप उपयुक्त ठरली. आजपर्यंत १८६ दात्यांनी प्लाझ्मा डोनेशन केले असून ३६२ अत्यवस्थ रुग्णांना प्लाझ्मा दिला आहे. यात अत्याधुनिक एस.डी.पी. डोनेशन मशिनचा वापर करण्यात आला.

| डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी | विनोद बियाणी | गनी मेमन |
|---|---|---|
| रक्तकेंद्र चेअरमन | मानद सचिव | उपाध्यक्ष |

**कोरोना काळातील रेडक्रॉसचे सेवाकार्य :-** मार्च २०२० पासून संपूर्ण जगात कोरोना महामारीचा उद्रेक झाला. त्यासंबंधी इंडियन रेडक्रॉस सोसायटी मार्फत विविध उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आणि अनेक उपक्रमांच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यातील नागरिकांना सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यात फिरता दवाखाना व औषधोपचार अंतर्गत विनामुल्य आरोग्य तपासणी, गरजूंना किराणा साहित्याची मदत, संस्थांमार्फत तयार जेवण वाटपासाठी स्वयंसेवकांची मदत, अन्न हे पूर्ण ब्रह्म कम्युनिटी किचन, कोरोना १९ रुग्णांना नाश्ता, फळे, जेवण वाटप,आर्सेनिक अल्बम ३० या होमिओपॅथी औषधी निर्मिती व वाटप,रेडक्रॉस व इकरा कॉलेज यांचे डेडीकेटेड कोविड सेंटर, कोविड रुग्णांच्या उपचारासाठी प्लाझ्मा डोनेशनचा सेवा उपक्रम,महाराष्ट्रातील पहिल्या अँटीबॉडी तपासणी केंद्रांचा शुभारंभ या प्रमुख उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांचे सविस्तर माहिती खाली देत आहोत.

| नं. | उपक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | जिल्ह्याभरात रेडक्रॉसमार्फत पोस्टरद्वारे जनजागृती- २००० पोस्टर्स | १७ मार्च २०२० |
| २ | २४ तास सेवेत तत्पर रेडक्रॉस रक्तकेंद्र... | कायमस्वरूपी सुरु |
| ३ | आपत्कालीन प्रसंगी गरजू रुग्णांसाठी Blood On Call सुविधा | कायमस्वरूपी सुरु |
| ४ | उत्स्फूर्त रक्तदान शिबीराचे आयोजन | कायमस्वरूपी सुरु |
| ५ | थॅलेसीमियाग्रस्त रुग्णांना सुरळीत रक्तपुरवठा -१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१- एकूण थॅलेसीमियाग्रस्त रक्तपुरवठा - १६०८ रक्तघटक | कायमस्वरूपी सुरु |
| ६ | जीवनदान व भावस्पर्श योजनेअंतर्गत गरजू रुग्णांना सवलतीत रक्तपुरवठा | कायमस्वरूपी सुरु |
| ७ | रेडक्रॉस पाटील धर्मार्थ दवाखान्याची सुरळीत रुग्णसेवा- १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१- एकूण रुग्ण तपासणी व उपचार - ८६०० | कायमस्वरूपी सुरु |
| ८ | जनता कर्फ्यूबाबत नागरिकांमध्ये आवाहन व जनजागृती - | २२मार्च २०२० |
| ९ | कोरोना रुग्णांना व नातेवाईकांना On Call समुपदेशन सेवा-२११ रुग्ण | २२ मार्च २०२० |
| १० | गरजू रुग्णांना घरपोच औषधी सेवा - ४७ रुग्ण | २२मार्च २०२० |
| ११ | रेडक्रॉसमार्फत मास्क व सॅनिटायजर वाटप - ८१०० मास्क आणि ३००० सॅनिटायजर वाटप | २७ मार्च २०२० पासून आजपर्यंत सुरु |
| १२ | इतर सेवाभावी संस्थांमार्फत तयार जेवण वाटपासाठी स्वयंसेवकांची मदत ७२००० फूड पाकीट वाटप | २ एप्रिल २०२० ते २१ मे २०२० |
| १३ | फिरता दवाखाना व औषधोपचार उपक्रमाअंतर्गत आरोग्य तपासणी - ७६८३ रुग्ण तपासणी व उपचार | ३ एप्रिल २०२० पासून आजपर्यंत सुरु |
| १४ | भाजीपाला व फळ विक्रेते यांची आरोग्य तपासणी - ७१७ विक्रेत्यांची तपासणी | ६ एप्रिल २०२० ते २६ एप्रिल २०२० |
| १५ | अन्न हे पूर्ण ब्रह्म कम्युनिटी किचन उपक्रम - १,३१,९८८ फूड पाकीट बनविणे व पोहोचविणे | ११ एप्रिल २०२० ते २२ जुलै २०२० |
| १६ | झोपडपट्टी भागात डेटॉल साबण वाटप - २००० साबण वाटप | २८ एप्रिल २०२० |
| १७ | गरजूंना किराणा साहित्याची मदत - ५६० कीट वाटप | ११ मे २०२० |
| १८ | कोविड रुग्णांना दोन वेळचे जेवण, चहा, नाश्ता आणि फळ व्यवस्था - ४१२९५ फूड पाकीट बनविणे व पोहोचविणे | ११ मे २०२० ते २२जुलै २०२० |
| १९ | पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस बांधवांची आरोग्य तपासणी - ५२० पोलीसांची तपासणी. | १७ मे २०२० ते |
| २० | आर्सेनिक अल्बम ३० या होमिओपॅथी इम्युनिटी औषधी निर्मिती व वाटप-१५,०४,४१० डबी बनविणे व वाटप | २७ मे २०२० |
| २१ | पोलीस अधीक्षक कार्यालय येथे महारक्तदान शिबिराचे आयोजन - १२४ रक्तदात्यांचे रक्तदान | १६ जुन २०२० |
| २२ | कोविड बाधित रुग्णांच्या उपचारासाठी प्लाझ्मा डोनेशनचा सेवा उपक्रम - ३६६ प्लाझ्मा बँग वितरण | २९ जुन २०२० ते ३० जुन २०२१ |
| २३ | रेडक्रॉस व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमान डेडीकेटेड कोविड सेंटर - १२३५ रुग्णसेवा | १४ जुलै २०२० ते ३१ मे २०२१ |
| २४ | गणेश विसर्जनासाठी स्वयंसेवकांची सेवा | १ सप्टेंबर २०२० |
| २५ | महाराष्ट्रातील पहिल्या अँटीबॉडी तपासणी केंद्रांचा शुभारंभ - | ३ ऑक्टोबर २०२० |
| २६ | कोरोना काळात सेवा दिलेल्या सर्व स्वयंसेवकांचा सन्मान - | ६ डिसेंबर २०२० |
| २७ | सर्व शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे, हॉस्पिटल्स येथे No mask -No entry स्टीकर लावणे - ५००० स्टिकर्स | ११ मार्च २०२१ ते २० मे २०२१ |
| २८ | रेडक्रॉस भवन येथे लसीकरण केंद्राचा शुभारंभ - ५९७०० नागरिकांचे लसीकरण | १६ मार्च २०२१ ते आजपर्यंत सुरु |
| २९ | कोविड १९- ॲन्टीजन तपासणीची विनामुल्य सेवा सुरु - १३८०८ रुग्णांची ॲन्टीजन तपासणी | २७ मार्च २०२१ ते २४ जुलै २०२१ |
| ३० | २० ड्युरा सिलेंडरच्या माध्यमातून शासकीय कोविड रुग्णालयातील रुग्णांना सुरळीत ऑक्सिजन पुरवठा - | ५ एप्रिल २०२१ ते आजपर्यंत सुरु |
| ३१ | इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने कोविड १९ ॲन्टीजन तपासणी शिबिराचे आयोजन - तीन ठिकाणी एकूण १५० रुग्ण तपासणी | ९ मे २०२१ ते २७ जून २०२१ |
